(2020-21)
Oct.-2020



Kisan Shikshan Prasarak Mandal,
Borgoan (Kale) Tq. & Dist. Latur's

NAAC Accredited 'B' Grade

# Vasantrao Kale Mahavidyalaya,

## Dhoki. Tq & Dist - Osmanabad.

&

## Akhil Maharashtra Itihas Parishad, Pune

Jointly Organize

One Day International Conference on

# "The History of Pandemic like Covid-19 & Its Impat on Socio-Economic & Political Sectors in the World"

Tuesday, 20th October 2020

ISSN No. : 2278-9308
Impact Factor : 7.675

Editor
Dr. N. P. Manale
(Convenor)

Chief Editor
Dr. Satish Kadam
(President, AMIP)

Executive Editor
Dr. Haridas Fere
(Principal)

Organized by

Department of History
Kisan Shikshan Prasarak Mandal, Borgoan (Kale) Tq. & Dist. Latur's
VASANTRAO KALE MAHAVIDYALAYA, DHOKI
Tq & Dist - Osmanabad - 413508

Scanned by CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 252 (CCXLII)
ISSN : 2278-9308
September, 2020

# INDEX

Marathi /Hindhi



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | वैश्विक महामारी :कोरोना व्हायरस ( कोविड १९ ) | प्रा.डॉ.सी.जी कडेकर | 1 |
| 2 | साथीच्या रोगांचा इतिहास आणि कोविड १९ | कविता रामहरी फुगे | 5 |
| 3 | कोविड १९ महामारीचा जगातील शिक्षण, रोजगार, संस्कृती आणि मानवी आरोग्यावर पडलेला प्रभाव | सन्मित बावासाहेब पाटोळे | 11 |
| 4 | महामारी और कोवीड-१९ का इतिहास | प्रा. डॉ. शे. रज़िया शहेनाज़ शे. अब्दुला | 16 |
| 5 | कोविड-१९ चा भारतातील स्त्रियांवरील परिणाम : एक आकलन | डॉ. शारदा सा. कदम | 20 |
| 6 | कोविड-१९ आणि स्त्रियांचे आहार, आरोग्य, मानसिकता : एक आकलन | डॉ. बबन पवार | 23 |
| 7 | भारतातील कोविड-१९ चा विविध क्षेत्रावरील परिणाम : एक आढावा | प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे | 26 |
| 8 | कोविड १९ का ग्रामीण जीवन पर प्रभाव | प्रा.डॉ.दळवे सुर्यकांत माधवराव | 29 |
| 9 | हवामान परिवर्तन आणि भारत | प्रा.डॉ.शिरमाळे महेबुबपाशा बाबूमीयाँ | 31 |
| 10 | कोव्हीड-१९ चा भारतीय ग्रामीण जीवनावरील परिणाम | प्रा.डॉ. सुदाम वसंतराव पवार | 37 |
| 11 | कोव्हीड-१९ चा भारतीय शहरी जीवनावरील परिणाम | प्रा. बालाजी शिंदे | 41 |
| 12 | कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील दिसून येणारे प्रासंगिक मूल्य | प्रा.डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी | 44 |
| 13 | कोरोना : लक्षणे, काळजी व उपाय | डॉ. भिम गणपतराव माने | 50 |
| 14 | कोविड–१९ व भारतीय समाज | प्रा. डॉ.घोलप कमलाकर गोरख | 54 |
| 15 | पर्यावरणात्मक घटकांवर कोविड – १९ चा परिणाम | डॉ. शेख रशिदा बेगम रहेमतुल्ला | 60 |
| 16 | कोरोना महामारी ( कोविड १९ ) चे सामाजिक,आर्थिक व राजकीय परिणाम. | प्रा.मिलिंद व्यंकटी घाडगे | 65 |
| 17 | प्लेग एक जगातील भयंकर आजार | प्रा. घाडगे रघुनाथ व्यंकटी | 69 |
| 18 | कोवीड–१९ का भारत के ग्रामीण जिवनपर परीणाम | प्रा. डॉ. राजेश एस. डोंगरे / प्रा. विनोद एम. बडवाईक | 71 |





Scanned by CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 252 (CCXLII)
ISSN : 2278-9308
November 2020

# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील दिसून येणारे प्रासंगिक मूल्य

प्रा.डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी .
(सहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग) शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
कळंब-४१३५०७ जि. उस्मानाबाद

*एकमेका साह्य करू I अवघे धरू सुपंथ II ही भावना काळाची गरज :- वर्तमानकाळात प्रत्येकालाच कमीत कमी कालावधीत सर्वकाही हवे आहे."युज आणि थ्रो" सर्वत्र बोलवाला आहे. धावपळीच्या युगात मानसिक आणि तनावाखाली वावरत आहे. बऱ्याचदा विनाकारण एखाद्या घटनेवरून कर्मचाऱ्यांना त्रास देऊन हल्ला करणारे अनेक लोक आहेत, असे दिसते की, असा हा संवेदना हरवत चाललेला समाज महासते साठी निश्चितच अडसर आहे।।

*माणसांना जोडणारे माणसे गेली कुठे*
*माणसांना जाणणारी माणसे गेली कुठे*
*मांडला बाजार येथे भावनांचा भावनांचा अन मनाचा*
*दुःख आतील वाचणारी माणसे गेली कुठे ?*

जीवन हे क्षणभंगूर बनत आहे.आत्मसंरक्षण, स्वसंरक्षण याच्याबाबतीत स्थिरतेकडून अस्थिरतेकडे समाजाची वाटचाल सुरु आहे. एकत्र कुटुंबपद्धती केवळ चित्रपट, मालिकेतून दिसत आहे. जगाला विज्ञान आणि तंत्रज्ञान या डॉक्टरचे महत्त्व पटले आहे,दिनानिमित्त सर्व आरोग्य क्षेत्रातील वैद्यकिय अधिकारी, परिचारिका, वार्डबाय आणि सफाई कर्मचारी आणि शेतकरी या सर्व योद्धाना लढ्यात अहोरात्र सेवा देत असल्याने आपल्या सर्वांच्या वतीने अतुलनीय कार्याबद्दल शुभेच्छा आणि मनःपूर्वक आभार !! कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आपण एकच नारा, "पुन्हा एकदा डॉक्टर्सना साथ देवू या I कोरोनावर विजय मिळवू या "यासाठी तुम्ही सहकार्य करा, इतरांना करायला सांगा.

साहित्य आणि समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अनेक साहित्यिकांनी आपल्या दर्जेदार साहित्यातून समाजाचे चिंतन केलेले आहे. साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखनातून तत्कालीन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे, समाजोपयोगी चिंतन केलेले आहे. प्रस्तुत शोध निबंधातून त्याचावेध घेतला आहे.

प्रस्तावनाः- जन्म व बालपण अण्णा भाऊ साठे यांचा जन्म ०१ ऑगस्ट १९२० रोजी प्रचंड गरिबी अन दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या कुटुंबात वारणा नदीच्या खोऱ्यातील वाटेगाव ता. वाळवा जिल्हा सांगली येथील खेड्यात मातंग जातीत झाला. उपेक्षा आणि जगण्याचा संघर्ष यांचे नाते जन्मापासूनच होते. जन्म, शिक्षण, संपत्ती व मुलभूत गरजांनी त्यांची उपेक्षाच केली. सतत कष्ट, जिद्द व भटकंती हे समीकरण बनलेल्या जीवनात कणखरपणाने मुकाबला



Scanned by CamScanner

करत आपल्या ध्येयवादाची आजन्म जोपासना करुन नावलौकिक मिळविला. वयाच्या दहाव्या वर्षी दीड दिवस शाळेत जाऊन शाळा सोडून दिली. बालपणी कोळसा,हमाल,हेलकरी,घरगडी अशा प्रकारची अनेक कामे केली. वयाच्या १२ व्या वर्षी अनवाणी, उपाशीपोटी वाटेगाव ते मुंबई हा २२७ कि.मी.चा प्रवास केला. ४९ वर्षाच्या जीवनात त्यांना सुखापेक्षा दु:खानेच अधिक सोबत केली. मावस भावाबरोबर कपड्याचे गाठोडे घेऊन मुंबईत अनवाणी फिरून तेथील दुकानाच्या पाट्या वाचून अण्णा भाऊ साक्षर झाले व खऱ्या अर्थाने ते साहित्यातून अनुभवाचे विद्यापीठ झाले. त्यांच्या ठायी सूक्ष्म निरीक्षणक्षमता विलक्षण बुद्धीमत्ता दिसून येते. त्याचवेळी त्यांनी आईला शब्द दिला," आई मी जगाच्या शाळेत शिकेन मोठा होऊन तुझे नाव उज्ज्वल करेन." अन तो शब्द खरा ठरवला.गिरणी कामगार झाले कष्ट प्रद जीवन जगताना आलेले कटू अनुभव लिखाणाद्वारे समाजासमोर मांडले.कथाकार,कादंबरीकार,नाटककार, शाहीर व लोकनाट्य लिहून कलापथकाच्या माध्यमातून अखंडपणे लोकजागृती केली.त्यातूनच ते साहित्यसम्राट, आपले अनुभव कथन करताना ते म्हणत,"मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही, त्याबाबत मी स्वत:ला बेडूक समजतो." त्यांच्या लेखनाचे दीन दलित उपेक्षित व वंचित समाजातील लोक त्यांचे सुख दु:ख केंद्र राहिले.वास्तव जीवनानुभव कथा वेदना ईर्षा जिद्द आणि कष्टकर्यांचा संघर्ष त्यातून अभिव्यक्त केला आहे.जगातील कष्टकरी कामगार यांचे प्रतिनिधित्व मोठ्या निष्ठेने केले म्हणूनच त्यांच्याविषयी नारायण सुर्वे एके ठिकाणी म्हणतात," अण्णा भाऊ साठे हे केवळ दलित जनतेचे लेखक नव्हते,ते तर जगातील सर्व अन्यायाविरूढ लढणाऱ्या समग्र मानव जातीचे लेखक होते,शाहीर होते."साहित्य समाजपरिवर्तनाचे माध्यम असून लेखक सामाजिक बांधिलकीसाठी लेखन करीत असतात. साहित्यातून जीवनाचे वास्तव मांडणारे तत्वज्ञान अथवा अंधश्रद्धा निर्मूलनाच्या प्रेरणा कोणत्याही ग्रंथातून घेतल्या नाहीत,आपल्या लेखणी द्वारे वास्तवाला भिडणारे विचार परखडपणे व्यक्त केले आहेत. त्यामुळे ते अनुभवाचे विद्यापीठ आणि जातिवंत साहित्यिक ठरतात.

उद्दिष्टे :-• मराठी साहित्यातील अण्णा भाऊ साठे यांचे कार्य समजून घेणे.

अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन संघर्षाचा आढावा घेणे.

- आपल्या विविध प्रकारच्या साहित्यातून समाजाला केलेला उपदेश व भूमिका विचारात घेणे.
- अण्णा भाऊ साठे एक दलित साहित्यिक होते, ही बाब लक्षात घेणे.
- अण्णा भाऊ साठे आणि तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा अनुबंध तपासून पाहणे.
- समाज सेवा हीच इश्वर सेवा मार्ग स्वीकारताना प्रपंचाला सांभाळूनच करावा.ही वृत्ती समजून घेणे.

गृहितके:- दलित साहित्यात कथा ,कादंबरी, नाटक,लोकनाट्य,पोवाडा इ. साहित्य प्रकारात दर्जेदार लेखन आहे.

दैनदिन कष्ट,हलाखीचे व संघर्षातून अण्णा भाऊ साठे यांनी समाज परिवर्तनाचा संदेश दिला आहे

ISSN : 2278-9308
November 2020

करत आपल्या ध्येयवादाची आजन्म जोपासना करून नावलौकिक मिळविला. वयाच्या दहाव्या वर्षी दीड दिवस शाळेत जाऊन शाळा सोडून दिली. बालपणी कोळसा,हमाल,हेलकरी,घरगडी अशा प्रकारची अनेक कामे केली. वयाच्या १२ व्या वर्षी अनवाणी, उपाशीपोटी वाटेगाव ते मुंबई हा २२७ कि.मी.चा प्रवास केला. ४९ वर्षाच्या जीवनात त्यांना सुखापेक्षा दुःखानेच अधिक सोबत केली. मावस भावाबरोबर कपड्याचे गाठोडे घेऊन मुंबईत अनवाणी फिरून तेथील दुकानाच्या पाट्या वाचून अण्णा भाऊ साक्षर झाले व खऱ्या अर्थाने ते साहित्यातून अनुभवाचे विद्यापीठ झाले. त्यांच्या ठायी सूक्ष्म निरीक्षणक्षमता विलक्षण बुद्धीमत्ता दिसून येते. त्याचवेळी त्यांनी आईला शब्द दिला," आई मी जगाच्या शाळेत शिकेन मोठा होऊन तुझे नाव उज्ज्वल करेन." अन तो शब्द खरा ठरवला.गिरणी कामगार झाले कष्ट प्रद जीवन जगताना आलेले कटू अनुभव लिखाणाद्वारे समाजासमोर मांडले.कथाकार,कादंबरीकार,नाटककार, शाहीर व लोकनाट्य लिहून कलापथकाच्या माध्यमातून अखंडपणे लोकजागृती केली.त्यातूनच ते साहित्यसम्राट. आपले अनुभव कथन करताना ते म्हणत,"मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही, त्याबाबत मी स्वतःला बेडूक समजतो." त्यांच्या लेखनाचे दीन दलित उपेक्षित व वंचित समाजातील लोक त्यांचे सुख दुःख केंद्र राहिले.वास्तव जीवनानुभव कथा वेदना ईर्षा जिद्द आणि कष्टकर्यांचा संघर्ष त्यातून अभिव्यक्त केला आहे.जगातील कष्टकरी कामगार यांचे प्रतिनिधित्व मोठ्या निष्ठेने केले म्हणूनच त्यांच्याविषयी नारायण सुर्वे एके ठिकाणी म्हणतात," अण्णा भाऊ साठे हे केवळ दलित जनतेचे लेखक नव्हते,ते तर जगातील सर्व अन्यायाविरूद्ध लढणाऱ्या समग्र मानव जातीचे लेखक होते,शाहीर होते."साहित्य समाजपरिवर्तनाचे माध्यम असून लेखक सामाजिक बांधिलकीसाठी लेखन करीत असतात. साहित्यातून जीवनाचे वास्तव मांडणारे तत्वज्ञान अथवा अंधश्रद्धा निर्मूलनाच्या प्रेरणा कोणत्याही ग्रंथातून घेतल्या नाहीत,आपल्या लेखणी द्वारे वास्तवाला भिडणारे विचार परखडपणे व्यक्त केले आहेत. त्यामुळे ते अनुभवाचे विद्यापीठ आणि जातिवंत साहित्यिक ठरतात.

**उद्दिष्टे :-** • मराठी साहित्यातील अण्णा भाऊ साठे यांचे कार्य समजून घेणे.

अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन संघर्षाचा आढावा घेणे.

- आपल्या विविध प्रकारच्या साहित्यातून समाजाला केलेला उपदेश व भूमिका विचारात घेणे.
- अण्णा भाऊ साठे एक दलित साहित्यिक होते, ही बाब लक्षात घेणे.
- अण्णा भाऊ साठे आणि तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा अनुबंध तपासून पाहणे.
- समाज सेवा हीच इश्वर सेवा मार्ग स्वीकारताना प्रपंचाला सांभाळूनच करावा.ही वृत्ती समजून घेणे.

⍰ गृहितके:- ⍰ दलित साहित्यात कथा ,कादंबरी, नाटक,लोकनाट्य,पोवाडा इ. साहित्य प्रकारात दर्जेदार लेखन आहे.

⍰ दैनदिन कष्ट,हलाखीचे व संघर्षातून अण्णा भाऊ साठे यांनी समाज परिवर्तनाचा संदेश दिला आहे



Scanned by CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 252 (CCXLII)
ISSN : 2278-9308
November 2020

. शिक्षण मिळालें,हेच खरे शिक्षण याची त्यांना खात्री पटली.

- दलित साहित्यातील त्याचे स्थान विद्रोही ,परिवर्तनवादी ,साहित्यिक म्हणून केलेले चळवळीसाठी काम वाखाणण्याजोगे आहे.
- महाराष्ट्रच्या मातीत जन्माला आलेले साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक व उपेक्षित, दलित साठी केलेले योगदान मोठे आहे.

- संशोधन पद्धती :- प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यासपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्री म्हणून प्रकाशित संदर्भ ग्रंथ,मासिक व इंटरनेटचा उपयोग करण्यात आला आहे.
- विषय प्रवेश –अण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तिमत्व हे बहुआयामी होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी कार्य केले. त्यांची जीवनानुभव व विलक्षण प्रतिभाशक्ती यामुळे ते एक शाहीर, कलावंत,साहित्यिक,समाजसेवक,राष्ट्रीय कार्यकर्ता,विचारवंत म्हणून नावलौकिक मिळविला. त्यांनी १९ कथासंग्रह,३७ कादंबऱ्या,०२ नाटके,शेकडो गाणी,१० लोकनाट्य,०२ शाहिरी वाड्मय आणि ०७ चित्रपट कथा लिहिल्या.यातून उपेक्षितांचे अंतरंगाचे पैलू विशद केले आहेत. त्यांनी एक प्रेरणादायी गीत लिहिले. बाबासाहेबांच्या विचारांवर त्यांची असीम निष्ठा होती त्यातून त्यांनी हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे. अशाप्रकारचे तत्वज्ञान सांगितले.

*जग बदल घालुनि घाव । सांगून गेले मला भीमराव ॥*
*गुलामगिरीच्या या चिखलात । रुतून बसला कोसवत ॥*

तत्कालीन सामाजिक परिस्थितीत त्यंचे साहित्य रुपवादी रंजनपर व परधार्जीन आणि भडक आहे.ते बाह्य प्रेरणेवर आधारलेले आहे अशी टीका झाली मराठी कादंबरीचे शतक लिहिणाऱ्या कुसुमावती देशपांडे यांनी तर कोण हे अण्णा भाऊ साठे ? अशा प्रश्नच केला दिवसभर कामानिमित्त फिरताना मुंबई मायानगरीचे चित्रण पुढीलप्रमाणे केले आहे, *" मुंबईत उंचावरी।*
*मलबार इंद्रपुरी।*
*कुबेराची वस्ती। तिथे सुख भोगती॥*
*परळात राहणारे।रात दिन राबणारे।*
*मिळेल ते खावून। घाम गळती॥"*

मुंबई ही गर्भ श्रीमंतांची नगरी,असे अनेकांनी वर्णन केले,पण भाऊना तीच खऱ्या अर्थाने विषमव्यवस्थेचे प्रतीक वाटते. वाटेगावच्या परिसरातील निसर्ग सौंदर्य,तुडुंब भरलेल्या नद्या,ग्रामदेवतांच्या यात्रा खेत्रात उत्सवी वातावरणात बालपण गेले.जत्रेत दांड्पट्टे,मर्दानी खेळ, आख्यायिका,ओव्यांचा त्याच्या मनावर अमीट ठसा उमटला.पतीव्रत्याचे पालन करणाऱ्या स्त्रिया अवतीभवती होत्या.त्याच निष्ठावान स्त्रियांचे होणारे शोषण तसेच झोपड पट्टीतील उघडे वागडे जगणे,उपाशी पोटी राहणे,त्यातून प्रचंड निर्माण होणारू वेदना चीड भूक शमविण्यासाठी केलेला अवेध मार्गाचा स्वीकार या भयानक अनुभवांचे पावलोपावली •अण्णा भाऊ यांच्या विषयी लिहिताना जनार्धन वाघमारे म्हणतात," *कुणास ठाऊक अण्णा भाऊंचे नाव उच्चताच*



Scanned by CamScanner

*माझ्या डोळ्यासमोर महारथी कर्णाची प्रतिमा उभी राहते माणसाचे मोठेपण त्याच्या जन्मावर नाही तर कर्मावर अवलंबून असते."*

महाराष्ट्राच्या इतिहास रोडवरील प्रेम व्यक्त करताना त्यांनी साहित्याच्या क्षेत्रात महाराष्ट्राची अस्मिता माधुरी केली आहे त्यात मराठी भाषा मराठी बाणा आणि मराठी संस्कृती याविषयीचे त्यांच्या मनामध्ये असणारे प्रचंड प्रेम जिव्हाळा व आत्मीयता अभ्यास साहित्य रेखाटले आहे

*"महाराष्ट्र मायभू आमुची।। मराठी भाषिकांची ।। संत महंतांची।।*
*ज्ञानवंतांना जन्म देणार । नररत्नांचे दिव्य भांडार ।।*
*समरधिर जिथे घेत अवतार ।।"*

•अण्णा भाऊ यांच्या खुळवाडी या पहिल्या कथासंग्रहाला दिलेल्या प्रस्तावनेत थोर लेखक प्र. के. अत्रे म्हणतात ,"अण्णा भाऊ साठे यांच्या कथे विषयी एका वाक्यात वर्णन करायचे तर असे सांगता येईल ,ही जगण्यासाठी लढणाऱ्या माणसाची कथा आहे. ही कच खाणारी हार मानणारी माणसे नाहीत या सर्वांना मानाने जगायचे आहे आणि आक्रमक वृत्तीशी लढून त्या सामन्यात त्यांना जिंकायचे आहे." स्मशानातील सोन : या कथेत भीमाच्या कष्टकरी जीवनाचे वर्णन केले आहे. गावात काम नसल्याने तो मुंबईला जातो.खाणीत कष्टाचे काम करतो. काहीं दिवसांनी खान बंद पडते. उपाशी असणारा भीमा स्मशानातील सोन शोधण्याचे काम सुरु करतो.एका रात्री भीमा पुरलेले प्रेत उकरताना कोळ लांडग्याच्या हिंस्त्र प्राण्यामध्ये झुंज होते त्याच मध्यरात्रीच्या झटापटीत प्रेताच्या जबड्यात भीमाचा हात अडकून बसतो ,बोटे तुटतात दरम्यान त्याचवेळी खाणीचे बंद पडलेले काम सुरु झाल्याची माहिती मिळते. पण भीमाच्या हाताला आता काम करण्यासाठी बोटे मात्र नसतात. अत्यंत भयानक दारिद्र्य असलेल्या जीवनाचे वास्तव कथेत रेखाटले आहे. त्यांनी या लेखनामागील भूमिका मांडताना ते म्हणतात,"माझी जीवनावर फार मोठी निष्ठा असून मला माणसे फार आवडतात, त्यांची श्रमशक्ती फार आहे.त्यांच्या बळावरच हे जग चालत. त्यांची झुंज व यश यावर माझा फार विश्वास आहे". सण समारंभ, जत्रा खेत्रा बैलगाड्यांची शर्यत कुस्त्यांचे फड,तमाशे, जागरण-गोंधळ,वाघ्या मुरळी, शेतकरी, शेतमजूर शेतीव्यवस्थेत होणारा बदल पिठाच्या गिरण्या, विहिरीवरील इंजिन आधुनिकतेमुळे कोसळणारा गावगाडा, नातेसंबध बालुतेदारीची स्थितीगती,सावकारशाही,श्रीमंत-गरीब यातील दर, श्रीमंत महिलांची प्रतिष्ठासाठी होणारी घुसमट, देशाच्या स्वातंत्र्याची आच, स्त्रियांचे शील,महारवाडा, मांगवाडा, वेशीवरील घडामोडी अशा अनेक बाबींचे वर्णन त्यांच्या साहित्यातून अचूकपणे त्यांची ग्रामीण भागाशी जोडलेली नाळ स्पष्ट दिसून येते. मुंबईतील कामगारांचे जीवन,त्यांचे वर्ग संघर्ष,संप मोर्चे,रोजीरोटीचा सवाल,कामगार चळवळीतील मतभेद,याबाबतीत त्यांनी श्रीपाद अमृत डांगे यांच्या सहवासामुळे,मार्क्सवादी भूमिकेतून लेखन केले. तमाशाला शासनाच्या बंदीतून बाहेर काढण्यासाठी लोकनाट्या ही संज्ञा वापरली.परिसराच्या वास्तवाची मांडणी केल्याने त्यांच्या साहित्याची सीमा वैश्विकतेशी जोडली गेली आहे. त्यांचे साहित्य भारतीय भाषांबरोबरच जर्मन,झेक,इंग्लिश, रशियन,स्लोव्हाक आदी भाषांत भाषांतरित झाले आहे. शेटजीचे इलेक्शन, देशभक्त घोटाळे, माझी मुबई , खापऱ्या चोर



Scanned by CamScanner

अशा काही रुढ शब्दातून लोकांसमोर वास्तव मांडले. माकडीचा माळ : रंगराव पाटील माकडवाल्याच्या दुर्गाला अडवून म्हणतो,"तुझ्यासारखी देखणी पोरगी माझ्या खोऱ्यातून सहसा सहीसलामत सुटत नाही." याला प्रती उत्तर देताना भडकून दुर्गा म्हणते," मी गरीबाची लेक पडले न्हाय तर तुला ठारच मारलं असत." या संवादावरून स्त्रियांना दुर्बल ना बनवता सक्षम बनविणे हे अण्णा भाऊनी निर्धारित केले होते. त्यंच्या साहित्यात पुरुषप्रधान नायकाप्रमाणेनेच स्त्री नायीकासुद्धा प्रभावीपणे साकारल्या आहेत.
कुरूप : कथेतील स्त्रिया या गारीब, दैन्य दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या आहेत.प्रसंगी कुलशील जपून विराट अवतार धारण करणाऱ्या, जबाबदारीने वर्तन करणाऱ्या आहेत.हरणा धनाच्या धुंदीत उन्मत झालेला बाबा पाटील कलंकित करू पाहतो. तेव्हा ती हरणा तिचा नवरा मेल्यावर आपल्या अब्रूची धिंडवडे काढू पाहणाऱ्या बाबा पाटलाला ठार करते.
•मीरा : मराठी प्रचलित साहित्याक्षेत्रात ही स्त्री प्रथम ठरते, ती स्त्रीत्व मनात जपून न्याय व हक्कासाठी धडपडणारी आहे.समाजात ती पवित्र व सन्मानपूर्वक जीवन जगू पाहते.मीरा तिच्या पतीपेक्षा दिसायला खूपच सुंदर रेखीव आहे. तिचे डोळे मादक मोहक आहेत यावरून सासू व नणंद तिचा वेळोवेळी द्वेष करतात.ती वाईट वागते असे खोटे तिच्या नवऱ्या ला सांगतात.त्यामुळे तिचा नवरा तिचा छळ करतात,तर दीर तीचे रूप व डोळे पाहण्यासाठी तडपतो .
•चिखलातील कमळ : यातील नायिका सुलक्षणी कुलवंत,नैतिक सुसंस्कारित आचरण करणारी आहेत. ती निरक्षर असूनही विचारी आहेत. सीता खंडोबाला सोडलेली मुरळी.नाचताना सुद्धा पैशापेक्षा अधिक शिलाला महत्व देते.कथेतील महादू पाटलाला बजावून सांगते ,"पन्नास रुपड्यासाठी शरीराची रुमान का करू? मला त्रास देणे हाच तुमचा हेतू असेल तर हे रुपये घेऊन चालते व्हा."
•सुलतान ;अण्णा भाऊंच्या कथेतील प्रत्येक नायक वैफल्यग्रस्त नसून ते शूर विजयी स्वावलंबी धाडसी व जगण्यासाठी नेहमी संगर्ष करणारे आहेत.सुलतान हा बेरोजगार असूनही तो काम करण्यासाठी धडपडतो परंतु त्याला काम मिळत नाही. आपण एखद्या हॉटेलात काम करू कारण या देशात गोर गरिबांना कधीही न मिळणारे गोड पदार्थ किंवा त्याचा भूसा तरी आपल्याला खायला मिळेल,किमान खाली सांडलेले तरी खायला मिळेलही त्याची ईच्छा.पण ती कधीही पूर्ण होत नाही. शेवटी त्याला कंटाळून आत्महत्या करावी वाटते.परंतु त्याचा तो प्रयत्न अयशस्वी होतो.नंतर तो ठरवतो,मी कधीही पोटासाठी मारणार नाही पोटासाठी लढेन,शेवटी तो तुरुंगात लढतो आणि तो दोन भाकरी जास्त मिळवतो.दुष्काळात गरिबांना सन्न मिळत नाही.तो म्हणतो कुत्र्यासारखे जगू नका अन्यायाचा प्रतिकार करा.मनगटावर भरोसा ठेवा या संदेशाने गरीब माणसे पोटासाठी धडपडतात. त्याला पाहिजे ते लुट्न आणतात . दुष्काळात जगतात,मात्र त्याचवेळी उच्च समाजातील लोक त्याच्यावर दरोडेखोर असा शिक्का मारतात.परंतु अशा लोकांची परिस्थिती ओळखायला पाहिजे,असे भाऊ सांगतात. त्याच्या साहित्यातून प्रचंड नितीमत्ता आलेली आहे.एका दारूवर आधारित कथेतील दोन माणस खूप